CCPS An AIChE Technology Alliance
Center for Chemical Process Safety
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# प्रक्रीयेतील जोखीम म्हणजे काय?

जानेवारी २०१५

बीकॉनच्या नोव्हेंबर व डिसेंबर २०१४ च्या आवृत्तींनी उद्योग जगतातील दोन गतकालीन भीषण दुर्घटनांचे ३०व्या वर्धापनाचे स्मरण दिले – मेक्सिको शहरातील सान जुआन इक्झॉटेपेक नोव्हेंबर १९८४ ची लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस (एलपीजी) साठा व वितरण केंद्रावरील भयानक आग व स्फोटांची मालीका आणि डिसेंबर १९८४ ची भारतातील भोपाळमधील विषारी वायूगळती. या दोन दुर्घटना हजारो लोकांवर आपत्ती आणणाऱ्या घटना होत्या. या बीकॉनमधील "आपण काय करू शकता?" या रकान्यातून तुमच्या कारखान्यात कोणती भीषण घटना घडू शकते व असा प्रसंग उद्‌भवू नये याची खात्री करण्यातील तुमची भूमिका समजून घेण्यास प्रात्साहीत केले होते.

तथापि तुम्हाला याचीसुध्दा जाणीव हवी की प्रक्रीयेतील भीषण दुर्घटना जी तुमच्या कारखान्यात घडू शकते तीच प्रक्रीयेतील सर्वात मोठी जोखीम असेलच असे नाही. घटना घडण्याची शक्यता किती आहे व तिचे परीणाम किती तीव्र असतील या दोन्हीचा गुणाकार म्हणजे जोखीम (3). तुमच्या कारखान्यात प्रक्रीयेतील भीषण परीणामकारक दुर्घटना घडणे दुर्मिळ असू शकेल. इतर कमी तीव्रतेच्या घटना घडण्याची शक्यता जास्त असेल ज्यामुळे अशा घटनांमधील जोखीम भीषण परीणामकारक दुर्घटनांपेक्षा जास्त असेल. तुमच्या कारखान्याच्या प्रक्रीयांतील सर्व जोखीमा व त्या नियंत्रित ठेवण्यातील तुमची भूमिका तुम्हाला माहीत असायला हवी.

1



2






## आपण काय करू शकता ?

तुमच्या कारखान्यातील प्रक्रीयेतील जोखीमांबाबत डिसेंबर 2014 च्या बीकॉनमध्ये सुचविल्याप्रमाणे प्रश्न विचाराः

- मी जिथे काम करतो तेथे व माझ्या कामातील प्रक्रीयेतील जोखीमा कोणत्या?
- प्रक्रीयेतील दुर्घटना प्रतिबंधित करणे किंवा त्या घडल्याच तर त्यांचे परिणाम कमी राखणे – अशा दोन्ही जोखीमा नियंत्रित करण्यासाठी कोणत्या व्यवस्था आहेत?
- या प्रक्रीयेतील जोखीम व्यवस्थापन व्यवस्था पुरेशा आहेत व व्यवस्थित कार्यरत आहेत हे मला कसे समजेल?
- माझ्या कारखान्यातील प्रक्रीयेतील सर्व जोखीमांचे व्यवस्थापन करणाऱ्या प्रणाली व्यवस्थित कार्यरत आहेत याची खात्री करण्यात माझी भूमिका कोणती?

**तुमच्या कारखान्यातील प्रक्रीया जोखीमा व त्यांच्या नियंत्रणातील तुमची भूमिका समजून घ्या**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, झेक, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.